# देहू नगरपंचायत कार्यालय ता.हवेली, जि.पुणे

Email: vdodehu@gmail.com

जा.क्र प्रशा./३८०९/२०२४-२५ दि. ०४/१२/२०२४

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

यादवारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची **सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १३/१२/२०२४ रोजी दुपारी १२:३०** वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**<u>नमूद 'अ' चे जोडपत्र</u>**

**देहू नगरपंचायतीची शुक्रवार दिनांक १३/१२/२०२४ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजाचे विषय**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजुर करणे.

३) वॉर्ड क्रमांक 13 मध्ये असलेले महाप्रवेशव्दार (मुख्य कमान देहू) चे रंग रंगोटी करणे व इतर अनुषंगीक कामे करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४) देहू नगरपंचायत हदीतील गणपती विसर्जनाकरीता कृत्रीम कुंड उभारणे व त्या अनुषंगीक कामे करणे याकामाचे अतिरीक्त देयक अदा करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत हदीतील सरकारी गायरानामध्ये झालेल्या अतिक्रमीत बांधकामावर कर आकारणी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) देहू नगरपंचायतच्या विविध विभागातील कामकाजाच्या संबंधी वार्षिक निवीदा काढणेस मंजूरी देणेबाबत विचार विनीमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

सौ.पूजा दिवटे
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

## मेहेरबान मा.अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय,देहू

यांचेकडे.....

सर्वसाधारण सभा | विषय क्रमांक :- 01

दिनांक : 13/12/2024 | ठराव क्रमांक :- 01

विषय क्रमांक 1: - मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्रमांक 1:- सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनिमय करण्यात आला. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सूचक :- सौ.पुनम विशाल काळोखे .

अनुमोदक :- श्री.प्रवीण रामदास काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

Private

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक- १३/१२/२०२४

Scanned with OKEN Scanner

## मेहेरबान मा.अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय,देहू.

यांचेकडे.....

सर्वसाधारण सभा | विषय क्रमांक :- 02

दिनांक : 13/12/2024 | ठराव क्रमांक :- 02

विषय क्रमांक 2 : - मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्रमांक 2 :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्यांचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सूचक :- सौ. रसिका स्वप्नील काळोखे

अनुमोदक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक - १३/१२/२०२४

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| **देहु नगरपंचायत देहु**<br>ता हवेली जि. पुणे. | सर्वसाधारण सभा<br>दिनांक :- १३/१२/२०२४<br>विषय क्रमांक :- ३<br>ठराव क्र. ३ |

**विषय— वॉर्ड क्र १३ मध्ये असलेले महाप्रवेशद्वार (मुख्य कमान देहू) चे रंग रंगोटी करणे व इतर अनुंषगीक कामे करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, बीज सोहळा, कार्तीकी सोहळा या साठी देहू शहरात मोठया संख्येने वारकरी, व भाविक भक्त येतात देहू शहरामधील मुख्य कमानीस व चौदा टाळकरी कमानीचा रंग पुसट झाला आहे त्यामुळे दोन्ही कमानीस रंगरंगोटी करणे आवश्यक असल्याने सदरचे काम हे नगरपंचायत / विकास निधीतुन करण्यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

| | |
|---|---|
| सौ. प्रियंकाताई मोरे<br>सुचक | श्री योगेश परंडवाल<br>अनुमोदक |

देहु नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे.

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

# देहु नगरपचांयत देहु

## देहू नगरपंचायत
## मा. सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - ०४
दिनांक - १३/१२/२०२४

ठराव क्रमांक- ०४
दिनांक - १३/१२/२०२४

विषय- देहू नगरपंचायत हद्दीत गणपती विसर्जनाकरिता कृत्रिम कुंड उभारणे व त्या अनुषंगिक कामे करणे या कामाचे अतिरिक्त देयक अदा करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू शहर हे एक मध्यवर्ती ठिकाण असून देहू लगतच पिंपरी चिंचवड हद्द खेड तालुका हद्द तसेच छावणी नगरपरिषद हद्दी जवळ असून सार्वजनिक गणेश विसर्जन मोठ्या प्रमाणात देहू नगरपंचायत हद्दीतून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदी मध्ये केले जाते. परंतु महाराष्ट्र शासनाच्या आकांक्षी प्रकल्पामधील एक प्रकल्प म्हणजे नदी प्रदूषण टाळणे याकरिता महाराष्ट्र शासन सर्वोपरी प्रयत्न करीत आहे याकरिता दरवर्षी गणपती विसर्जना करिता देहू नगरपंचायत मार्फत कृत्रिम कुंड देहू शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात येतात. सदर निविदेमध्ये कृत्रिम कुंड उभारणे तसेच त्या ठिकाणी लागणारा मनुष्यबळ पुरविणे व संकलन केलेल्या मुर्त्या देहू नगरपंचायत मार्फत सोय करून देण्यात ठिकाणी विसर्जन करणे असे काम देण्यात येत असते. सन २०२४ मध्ये देखील देहू नगरपंचायत आरोग्य विभागामार्फत दि.२८.०८.२०२४ रोजी दै.सामना पेपर द्वारे देहू नगरपंचायत हद्दीत गणपती विसर्जनाकरिता कृत्रिम कुंड उभारणे व त्या अनुषंगिक कामे करणे जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने दि. ३०.०८.२०२४ रोजी देहू नगरपंचायत आवक विभागात सदर कामारिता एकूण ३ निविदा बंद लिफाफ्यामार्फत प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदांचा कागदोपत्री अभ्यास केले असता एकूण ३ निविदा धारक म्हणजेच १.मे. सिध्देश चंद्रकांत गायकवाड २. मे. पद्मावती एंटरप्रायझेस ३. मे. नील शिव अगरवाल आर्थिक लखोटे उघडण्यास पात्र ठरले. त्या अनुषंगाने आर्थिक लखोटे उघडले असता मे. सिध्देश चंद्रकांत गायकवाड यांचे दर इतरांच्या तुलनेत कमी असलेने सदरचा विषय दि.05.09.2024 रोजीच्या स्थायी समितीच्या सभेत ठेवण्यात आलेला होता. सदरच्या सभेत मे. सिध्देश चंद्रकांत गायकवाड यांचे कुंड पुरविनेचे प्रती दिनाचे दर म्हणजेच रक्कम रु.१७.२००/- इतके असल्याने त्यांना वाटाघाटी करण्याचे पत्र देऊन सदरचा दर कमी करण्यात यावा असा ठराव मा. स्थायी समिती सभा दि.05.09.2024 रोजी करण्यात आलेला होता. त्या नुसार सदर निविदा धारकास देहू नगरपंचायत मार्फत दि.05.09.2024 रोजी वाटाघाटी करिता पत्र देण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने मे. सिध्देश चंद्रकांत गायकवाड यांनी देहू नगरपंचायतीस आ.क्र.८०३६ दि.०५.०९.२०२४ रोजीच्या पत्राने कुंड पुरविनेचे प्रती दिनाचे दर म्हणजेच रक्कम रु.१४.०००/- करत असल्याचे पत्राद्वारे कळविले होते. त्यानुसार देहू नगरपंचायत मार्फत दि.०६.०९.२०२४ रोजी मूळ कामाचा कार्यादेश जा.क्र. दे.न./कार्यादेश/३६२२/२०२४-२५ अन्वये सदर ठेकेदारास देण्यात आला होता. गतवर्षी म्हणजेच सन २०२३ च्या गणेशोत्सव करिता देहू नगरपंचायत हद्दीत गणपती विसर्जनाकरिता एकूण ४ दिवस कृत्रिम कुंड उभारण्यात आलेले होते परंतु मागील वर्षातील नागरिकांचा भव्य प्रतिसाद पाहता यावर्षी दि. ०८.०९.२०२४ रोजी एकूण २ कुंड, दि.०९.०९.२०२४ रोजी एकूण २ कुंड, दि.११.०९.२०२४ रोजी एकूण ६ कुंड, दि.१२.०९.२०२४ रोजी एकूण ६ कुंड, दि.१३.०९.२०२४ रोजी एकूण ६ कुंड, दि.१५.०९.२०२४ रोजी एकूण ६ कुंड, दि.१६.०९.२०२४ रोजी एकूण ६ कुंड, व दि.१७.०९.२०२४ रोजी एकूण १६ कुंड, असे एकूण ८ दिवस गणपती विसर्जनाकरिता कृत्रिम कुंड देहू नगरपंचायत हद्दीत उभारण्यात आले होते. उभारण्यात आलेल्या कृत्रिम कुंडामध्ये ८ दिवसांमध्ये एकूण ८२७९ मुर्त्यांचे संकलन करण्यात आले होते. दरवर्षी देहू नगरपंचायत हद्दीतील कृत्रिम कुंड येथे संकलन करण्यात आलेले

Scanned with OKEN Scanner

गणेश मुर्त्या देहू नगरपंचायत हद्दीतील खाणीमध्ये पुनश्य असे विसर्जन देहू नगरपंचायत मार्फत करण्यात येते. परंतु देहू नगरपंचायत हद्दीतील सदरील खाण पूर्णपणे बुजविण्यात आल्या मुळे तसेच इतर उपलब्ध खाणींमध्ये गणपती विसर्जनाकरिता परवानगी मिळाली नसल्याने देहू नगरपंचायत मार्फत यावर्षी संकलन केलेल्या गणेश मुर्त्या श्री फाऊनडेशन पुणे या संस्थेस दान करण्याचे निश्चित करण्यात आले. श्री फाऊनडेशन पुणे हि संस्था गेल्या १० वर्षापासून पुणे जिल्हातील हद्दीतील गणपती दान योजना राबविते. सदरची संस्था नगरपंचायत/नगरपरिषद/महानगरपालिका यांच्याकडे मुत्यांची मागणी करते. सदरची संस्था अंध बालक,अपंग, अनाथ मुले यांच्याकरिता कार्य करत आहे. सदरची संस्था संकलन केलेल्या मूर्तीचा पुनर्वापर करते व त्यातून येणाऱ्या फंडातून अंध बालक,अपंग, अनाथ मुले यांकरिता दिवाळी खरेदी तसेच त्यांना सर्व गरजा पुरविण्याचे काम करते. सदरच्या संस्थेचे म्हाळुंगे बालेवाडी व आळंदी येथे अशी २ गोडाऊन असून सदरच्या मुर्त्या नगरपंचायत मार्फत गोडाऊन पर्यंत पोच करण्याची जबाबदारी असते. याकरिता देहू नगरपंचायत हद्दीतील संकलन केलेल्या मुर्त्या गणपती विसर्जना दिवशी श्री फाऊनडेशन पुणे यांच्या गोडाउन पर्यंत पोच करणे शक्य नसल्याने देहू नगरपंचायत हद्दीतील राधाकृष्ण मंगल कार्यालय येथे जमा करण्यात आलेल्या होत्या व सदरच्या मुर्त्या दि. ११.०९.२०२४ ते २०.०९.२०२४ पर्यंत अतिरिक्त मनुष्यबळ व अतिरिक्त वाहनांचा वापर करून एकूण ८२७९ इतक्या मुर्त्या श्री फाऊनडेशन पुणे यांना दान करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मे. सिध्देश चंद्रकांत गायकवाड यांनी देहू नगरपंचायतकडे केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.१४,५५,२००/-(GST वगळता) जमा केलेले असून सदरची निविदेमध्ये एकूण रक्कम ९,९९,०००/- इतका खर्च अपेक्षित होता परंतु गणेश विसर्जनाकरिता वाढत्या दिवसांची संख्या त्यामुळे लागलेल्या अतिरिक्त कुंडांची संख्या व श्री फाऊनडेशन पुणे यांना दान करण्यात आलेल्या मुर्त्याकरिता लागलेला अतिरिक्त मनुष्यबळ व वाहने यामुळे सदरच्या निविदेमध्ये अतिरिक्त खर्च म्हणजेच एकूण रु.४,५५,२००/- (GST वगळता) व एकूण खर्च रु.१७,१७,१३६/-/-(GST सहित) अदा करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विविध शासकीय योजनेतून करण्यात यावा.

Mayur

सूचक : श्री.मयूर शिवशरण

अनूमोदक : श्री.सुधीर सु. काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

सौ. पूर्णा अ.दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहु नगरपंचायत देहु
# ता हवेली, जि. पुणे.

सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक :- ५

ठराव क्रमाक :-५ दिनांक १३/१२/२०२४

**विषय: देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायराना मध्ये झालेल्या अतिक्रमित बांधकामांवर कर आकारणी करणे बाबत**

कर विभागाच्या उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व मालमात्तांचे महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती औद्योगिक व नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये सर्व मालमातांचे सर्वेक्षण आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ करण्यात आलेले आहे .या मध्ये शहरातील सर्व मालमत्तांचा समावेश करण्यात आलेला आहे . सर्वेक्षणा मध्ये वार्ड क्रमांक ६ व ७ मध्ये ग्रामपंचायत कालीन या मालमत्तांची संख्या २६६ व सरकारी घरकुल 62 इतकी होती .परंतु या सर्वेक्षणा मध्ये या मालमता ६३७ इतक्या झालेल्या आहेत. यामध्ये जवळ पास ४०० पक्की घरे व २२७ कच्या घरांच्या समावेश आहे . यातून असे निष्पन्न होते कि या अतिक्रमित मालमत्तांची संख्या दुपटीने वाढली आहे . त्या भविष्यात अतिक्रमण वाढू नये यासाठी योग्य त्या उपाय योजना करणे.तसेच सर्वेक्षणा मध्ये नव्याने आलेल्या अतिक्रमित मालमत्तांवर कर आकारणी कारावे कि कसे या याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे अतिआवश्यक आहे .

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि ,या पुढे अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी गायरानातील मालमत्तेचा रीतसर सर्वे करून २०११ च्या अगोदरची बांधकामे वगळून जि नाविन बांधकामे आहेत त्यांच्यावर शासन नियमाप्रमाणे अनधिकृत बांधकाम कारवाई करण्यात यावी.तूर्तास सरकारी गायरान परिसरातील बांधकामावरील कर आकारणी थांबवावी.तसेच अतिक्रमण काढण्याच्या दृष्टीने नियमानुसार कारवाई करण्यात यावी . करिता हि सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे .

सूचक : श्री योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक: श्री योगेश बाळासाहेब परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

सौ पूजा अमोल दिवटे

अध्यक्ष

देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

# देहु नगरपंचायत देहु
# ता हवेली, जि. पुणे.

सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक :- ५

ठराव क्रमाक :-५ दिनांक १३/१२/२०२४

**विषय: देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायराना मध्ये झालेल्या अतिक्रमित बांधकामांवर कर आकारणी करणे बाबत**

कर विभागाच्या उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व मालमात्तांचे महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती औद्योगिक व नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११५ अन्वये सर्व मालमातांचे सर्वेक्षण आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ करण्यात आलेले आहे .या मध्ये शहरातील सर्व मालमत्तांचा समावेश करण्यात आलेला आहे . सर्वेक्षणा मध्ये वार्ड क्रमांक ६ व ७ मध्ये ग्रामपंचायत कालीन या मालमत्तांची संख्या २६६ व सरकारी घरकुल 62 इतकी होती .परंतु या सर्वेक्षणा मध्ये या मालमता ६३७ इतक्या झालेल्या आहेत. यामध्ये जवळ पास ४०० पक्की घरे व २२७ कच्या घरांच्या समावेश आहे . यातून असे निष्पन्न होते कि या अतिक्रमित मालमत्तांची संख्या दुपटीने वाढली आहे . त्या भविष्यात अतिक्रमण वाढू नये यासाठी योग्य त्या उपाय योजना करणे.तसेच सर्वेक्षणा मध्ये नव्याने आलेल्या अतिक्रमित मालमत्तांवर कर आकारणी कारावे कि कसे या याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे अतिआवश्यक आहे .

वरील बाबींचा विचार करता हि सभा असे ठरविते कि ,या पुढे अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी गायरानातील मालमत्तेचा रीतसर सर्वे करून २०११ च्या अगोदरची बांधकामे वगळून जि नाविन बांधकामे आहेत त्यांच्यावर शासन नियमाप्रमाणे अनधिकृत बांधकाम कारवाई करण्यात यावी.तूर्तास सरकारी गायरान परिसरातील बांधकामावरील कर आकारणी थांबवावी.तसेच अतिक्रमण काढण्याच्या दृष्टीने नियमानुसार कारवाई करण्यात यावी . करिता हि सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत आहे .

सूचक : श्री योगेश हनुमंत काळोखे
अनुमोदक: श्री योगेश बाळासाहेब परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

P.Divate
सौ पूजा अमोल दिवटे
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १३/१२/२०२४
विषय क्रमांक :- ६
ठराव क्र. ६

**विषय— देहू नगरपंचायतच्या विविध विभागातील कामकाजाच्या संबंधी वार्षिक निविदा काढणेस मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, बीज सोहळा, कार्तीकी सोहळा या साठी देहू शहरात मोठया संख्येने वारकरी, व भाविक भक्त येत असतात वारकरी व भाविक भक्तांना मुलभूत सोयी सुविधी पुरविणे आवश्यक आहे. तसेच इतर अत्यावश्यक कामे करणे गरजेचे असल्यामुळे निविदा प्रक्रीया करणेस बराच कालावधी लागत असतो त्यामुळे खालील नमूद कामांच्या वार्षीक निविदा काढणे गरजेचे आहे.

१. देहू नगरपंचायत हद्दीत शौचालय दुरुस्तीची व त्या अनुंषगीक इतर कामे करणे.
२. देहू नगरपंचायत हद्दीत बांधकाम विषयक साहित्य पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
३. देहू नगरपंचायत हद्दीत पॅचवर्क ची कामे करणे.
४. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता विविध ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरे पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
५. देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता विविध भागात Flood lights तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
६. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता व इतर वेळेस आवश्यकतेनुसार मंडप बसविणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
७. देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता अनुंषगाने पब्लिक अॅड्रेस सिस्टीम पुरविणे व इतर अनुंषगीक कामे करणे.
८. देहू नगरपंचायत आवश्यकतेनुसार फ्लेक्स पुरवठा करणे.
९. देहू नगरपंचायत आवश्यकतेनुसार विदयुत साहित्य पुरवठा करणे व विदयुत विषयक देखभाल दुरुस्तीची करणे.
१०. देहू नगरपंचायत कार्यालयातील संगणक ची देखभाल दुरुस्ती करणे, व इतर अनुंषगीक कामे करणे.
११. देहू नगरपंचायत वाहंनाकरीता व जलशुदधीकरण केंद्र बोडकेवाडी येथील जनरेटर करीता डिझेल / पेट्रोल / इंधन खरेदी करणे.
१२. देहू नगरपंचायत करीता आवश्यकतेनुसार मोबाईल टॉयलेट पुरवठा करणे.
१३. देहू नगरपंचायत आरोग्य विभागाकरीता आवश्यकतेनुसार मशिनरी पुरवठा करणे.

Scanned with OKEN Scanner

१४.देहू नगरपंचायत आरोग्य विभागाकरीता आवश्यकतेनुसार साहित्य पुरवठा करणे.
१५.देहू नगरपंचायत हद्दीत दिशा दर्शक फलक बसविणे व फलक दुरुस्ती विषयक कामे करणे.
१६. देहू शहरात आवश्यकतेनुसार सी सी टी व्ही कॅमेरा पुरविणे व बसविणे
१७.देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथे जनरेटर करीता शेड उभारणे व त्या अनुषंगीक कामे करणे.
१८.देहू नगरपंचायत हद्दीत एस.टी.पी. येथे चेनलिंग फेन्सिंगचे काम करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणे
१९. देहू नगरपंचायत हद्दीत विविध ठिकाणी ड्रेनेज अनुषगीक कामे करणे.
२०. देहू नगरपंचायत करीता तांत्रीक सल्लागार पॅनेल नेमणुक करणे.
२१. देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यक त्या वेळी चहा, नाश्ता, व जेवण पुरवठा करणे
२२.देहू नगरपंचायत कार्यालयातील विविध विभागाकरीता आवश्यक असणारे छपाई साहित्य पुरवठा करणे.
२३.देहू नगरपंचायत कार्यालयात वेळोवेळी साजरे होणा-या महापुरषांच्या जयंती करिता तसेच इतर कार्यक्रमाकरिता आवश्यक असणारे हार – फुले सत्कार साहित्य यांचा पुरवठा करणे
२४. देहू नगरपंचायत कार्यालयातील विविध विभागाकरीता आवश्यक असणारे स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे.
२५.देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यक त्या वेळी कापड टी-शर्ट छपाई करून पुरवठा करणे
२६.देहू नगरपंचायत कार्यालयात होणा-या कामाकाजकरिता व समारंभा करिता व्हीडिओ शुटींग व छायाचित्रण करणे.
२७. देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यकतेनुसार कुशल व अकुशल कर्मचारी पुरवठा करणे.

त्यामुळे वरील नमूद कामास शासनाकडून अनुदान प्राप्त होणार नाही तरी सदरचे काम हे नगरपंचायत / विकास निधीतुन करण्यासाठी ही सभा या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

सर्वसाधारण सभा
दिनांक :- १३/१२/२०२४
विषय क्रमांक :- ६
ठराव क्र. ६

**विषय— देहू नगरपंचायतच्या विविध विभागातील कामकाजाच्या संबंधी वार्षिक निविदा काढणेस मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, बीज सोहळा, कार्तीकी सोहळा या साठी देहू शहरात मोठया संख्येने वारकरी, व भाविक भक्त येत असतात वारकरी व भाविक भक्तांना मुलभूत सोयी सुविधी पुरविणे आवश्यक आहे. तसेच इतर अत्यावश्यक कामे करणे गरजेचे असल्यामुळे निविदा प्रक्रीया करणेस बराच कालावधी लागत असतो त्यामुळे खालील नमूद कामांच्या वार्षीक निविदा काढणे गरजेचे आहे.

१. देहू नगरपंचायत हद्दीत शौचालय दुरुस्तीची व त्या अनुंषगीक इतर कामे करणे.
२. देहू नगरपंचायत हद्दीत बांधकाम विषयक साहित्य पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
३. देहू नगरपंचायत हद्दीत पॅचवर्क ची कामे करणे.
४. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता विविध ठिकाणी सी सी टी व्ही कॅमेरे पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
५. देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता विविध भागात Flood lights तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
६. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता व इतर वेळेस आवश्यकतेनुसार मंडप बसविणे व त्या अनुंषगीक कामे करणे.
७. देहू शहरात जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, कार्तीकी सोहळा करीता अनुंषगाने पब्लिक अॅड्रेस सिस्टीम पुरविणे व इतर अनुंषगीक कामे करणे.
८. देहू नगरपंचायत आवश्यकतेनुसार फ्लेक्स पुरवठा करणे.
९. देहू नगरपंचायत आवश्यकतेनुसार विदयुत साहित्य पुरवठा करणे व विदयुत विषयक देखभाल दुरुस्तीची करणे.
१०. देहू नगरपंचायत कार्यालयातील संगणक ची देखभाल दुरुस्ती करणे, व इतर अनुंषगीक कामे करणे.
११. देहू नगरपंचायत वाहनाकरीता व जलशुदधीकरण केंद्र बोडकेवाडी येथील जनरेटर करीता डिझेल / पेट्रोल / इंधन खरेदी करणे.
१२. देहू नगरपंचायत करीता आवश्यकतेनुसार मोबाईल टॉयलेट पुरवठा करणे.
१३. देहू नगरपंचायत आरोग्य विभागाकरीता आवश्यकतेनुसार मशिनरी पुरवठा करणे.

Scanned with OKEN Scanner

१४.देहू नगरपंचायत आरोग्य विभागाकरीता आवश्यकतेनुसार साहित्य पुरवठा करणे.
१५. देहू नगरपंचायत हद्दीत दिशा दर्शक फलक बसविणे व फलक दुरुस्ती विषयक कामे करणे.
१६. देहू शहरात आवश्यकतेनुसार सी सी टी व्ही कॅमेरा पुरविणे व बसविणे
१७.देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथे जनरेटर करीता शेड उभारणे व त्या अनुषंगीक कामे करणे.
१८. देहू नगरपंचायत हद्दीत एस.टी.पी. येथे चेनलिंग फेन्सिंगचे काम करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणे
१९. देहू नगरपंचायत हद्दीत विविध ठिकाणी ड्रेनेज अनुंषगीक कामे करणे.
२०. देहू नगरपंचायत करीता तांत्रीक सल्लागार पॅनेल नेमणुक करणे.
२१. देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यक त्या वेळी चहा, नाश्ता, व जेवण पुरवठा करणे
२२. देहू नगरपंचायत कार्यालयातील विविध विभागाकरीता आवश्यक असणारे छपाई साहित्य पुरवठा करणे.
२३. देहू नगरपंचायत कार्यालयात वेळोवेळी साजरे होणा-या महापुरषांच्या जयंती करिता तसेच इतर कार्यक्रमाकरिता आवश्यक असणारे हार – फुले सत्कार साहित्य यांचा पुरवठा करणे
२४. देहू नगरपंचायत कार्यालयातील विविध विभागाकरीता आवश्यक असणारे स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे.
२५. देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यक त्या वेळी कापड टी-शर्ट छपाई करून पुरवठा करणे
२६. देहू नगरपंचायत कार्यालयात होणा-या कामाकाजकरिता व समारंभा करिता व्हीडिओ शुटींग व छायाचित्रण करणे.
२७. देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यकतेनुसार कुशल व अकुशल कर्मचारी पुरवठा करणे.

त्यामुळे वरील नमूद कामास शासनाकडून अनुदान प्राप्त होणार नाही तरी सदरचे काम हे नगरपंचायत / विकास निधीतुन करण्यासाठी ही सभा या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner